**(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)**

**<u>मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या न्यायधिकारात.</u>**

**<u>नागपूर खंडपीठ, नागपूर.</u>**

**<u>दुसरे अपील क्र. २४१-२००६</u>**

**तुळशीराम वल्द जयाजी हजारे,**

वय अंदाजे ३९ वर्ष, धंदा - शेती,

राहणार - अडगाव हजारे, पोस्ट - कोकलगाव,

तालुका व जिल्हा वाशिम ..... **<u>अपीलकर्ता</u>**

**(मूळ वादी)**

**- विरुद्ध -**

**(१) तहसीलदार, वाशिम,**

महसूल मंडळ, वाशिम,

तालुका व जिल्हा वाशिम.

**(२) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,**

कार्यकारी अभियंता, वाशिम यांच्या मार्फत,

तालुका व जिल्हा वाशिम.

**(३) महाराष्ट्र राज्य,**

जिल्हाधिकारी वाशिम यांच्या मार्फत. ..... **<u>उत्तरवादी</u>**

**(मूळ प्रतिवादी )**

∞∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞∞ ∞ ∞ ∞ ∞∞ ∞ ∞

अपीलकर्ता (र्त्यां) करीता वरिष्ठ वकील श्री. आर. एल. खापरे, यांच्या वतीने वकील श्री. व्ही.ए. लोहिया.

श्री एम.ए. कडू, उत्तरवादी/राज्यासाठी सहाय्यक सरकारी अभियोक्ता

∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞ ∞∞ ∞ ∞ ∞ ∞∞ ∞ ∞

**<u>न्यायमंच - श्रीमती. एम .एस . जवळकर, न्यायमूर्ति.</u>**

**<u>१३ मार्च २०२ ३.</u>**

**<u>मौखिक न्यायनिर्णय-</u>**

. विद्यमान दिवाणी न्यायधीश वरिष्ठ स्तर, वाशिम यांनी नियमित दिवाणी दावा क्रमांक १४१/१९९७ मधे दिनांक १५/०३/२००० रोजी पारित केलेला न्यायनिर्णय आणि हुकूमनाम्या विरुद्ध प्रतिवादी यांनी विद्यमान २ रे तदर्थ अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश, वाशीम यांच्या समक्ष दाखल केलेल्या नियमित दिवाणी अपील क्र.८९/२००१ मधे दिनांक १३/१२/२००५ रोजी त्यांनी मंजूर केलेल्या न्यायनिर्णय आणि हुकूमनाम्याने व्यथित झाल्यामुळे प्रस्तुत अपीलकर्त्याने सदर अपील दाखल केली आहे.

(२) या दुसऱ्या याचिकेवर निर्णय घेण्याकरीता असलेले संक्षिप्त तथ्ये खालीलप्रमाणे आहेत :-

यातील अपीलकर्ता हा मूळ वादी आहे. ज्याने सदर दावा म्हणजेच नियमित दिवाणी दावा क्र. १४१/१९९७ कायमस्वरुपी मनाईहुकूम मिळण्याकरीता दाखल केला आहे. वादीचा असा युक्तिवाद आहे की दाव्यातील मालमत्ता ही १६ x २० चौरस फूट आकाराची खोली असून दगड आणि मातीने बांधलेली असून त्यामध्ये १९८५ साली एक पीठ गिरणी स्थापण्यात आली असून सदर बांधलेली खोली ही वादीच्या पूर्वजांची आणि जुनी मालमत्ता आहे. दाव्यातील मालमत्तेचे वर्णन विशेषतः दाव्याच्या परिच्छेद १ मध्ये केले आहे. सदर खोली वादीची वडिलोपार्जित मालमत्ता आहे जी त्याच्या पूर्वजांनी सुमारे ५० वर्षांपूर्वी बांधली आहे आणि त्या खोलीत वादीने १९८५ साली पीठ गिरणी स्थापित केली होती. मार्च १९९७ मध्ये प्रतिवादींनी दावा केला की त्यानी प्रकाश चिंकुजी काकडे या व्यक्तीला दाव्यातील मालमत्तेचा लिलाव केला. इतकेच नाही तर दिनांक १९/०६/१९९७ रोजी प्रतिवादी क्र. १ यांनी कोणत्याही अधिकाराशिवाय, प्रतिवादी क्र. २ महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांना पीठ गिरणीचा वीजपुरवठा खंडित करण्यास सांगितले. त्यानुसार, दिनांक १९/०६/१९९७ रोजी, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचा तारमार्ग तंत्री (लाइन-मॅन) वीज पुरवठा खंडित करण्यासाठी वादीच्या पीठ गिरणीत आला. मात्र, वादीच्या विनंतीवरून तो परत गेला. जेव्हा वादीने प्रतिवादी क्र. १ ला विचारणा केली असता प्रतिवादी क्र. १ ने दाव्यातील मालमत्तेचे बांधकाम सरकारी जमिनीवर आहे, त्यामुळे वादीने हे बांधकाम काढून टाकले पाहिजे असे सांगीतले. त्याने पुढे असा दावा केला की दाव्यातील उक्त मालमत्तेचा लिलाव प्रकाश काकडे यांना करण्यात आला आहे आणि जर वादीने सदर बांधकाम काढून टाकले नाही तर प्रतिवादी क्र.

१ ते सरकारी यंत्रणेद्वारे काढून टाकेल. कोणत्याही अधिकाराशिवाय दाव्यातील मालमत्ता काढून टाकण्यासाठी प्रतिवादी क्र. २ बेकायदेशीरपणे सरकारी यंत्रणेचा वापर करेल अशी भीती लक्षात घेऊन, फिर्यादीला सदर दावा दाखल करण्यास भाग पाडण्यात आले. वादीने प्रतिवादी क्र. १ विरुद्ध दाव्यातील मालमत्ता काढून टाकण्यापासून कायमचा मनाईहुकूम आणि प्रतिवादी क्र. २ विरुद्ध दाव्यातील मालमत्तेचा विद्युत पुरवठा खंडित करण्यापासून मनाई करण्यासाठी दावा केला.

प्रतिवादींनी लेखी निवेदन दाखल करून सदर भूखंडाचा लिलाव प्रकाश काकडे यांना करण्यात आला आहे आणि त्यामुळे सदर भूखंडावरील अतिक्रमण हटवण्याचा सरकारला पूर्ण अधिकार आहे या आधारावर दाव्याला विरोध केला. प्रतिवादी क्र.२ -महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने देखील लेखी निवेदन दाखल केले आणि सादर केले आहे की त्याचा मालकीशी आणि दाव्यातील संबंधित भूखंडाशी काहीही संबंध नाही, तथापि, अतिक्रमण हटवायचे असेल तर वीजपुरवठा थांबवावा लागेल. प्रतिवादी क्र. ३ - त्यानंतर महाराष्ट्र राज्याला एक पक्ष म्हणून समाविष्ट करण्यात आले. त्यानी प्रतिवादी क्र. १ यांनी दाखल केलेले लेखी निवेदन स्वीकारले.

विद्यमान न्यायचौकशी न्यायालयाने असे मान्य केले आहे कि वादीने तो दाव्यातील मालमत्तेचा मालक आहे हे सिद्ध केले आहे आणि अतिक्रमण झालेले अजिबात सिद्ध झाले नाही. विद्यमान न्यायचौकशी न्यायालयाने असेही म्हटले आहे की प्रतिवादी, कोणत्याही अधिकाराशिवाय, वादीला दाव्यातील जमिनीवरून बेकायदेशीरपणे बेदखल करण्याचा प्रयत्न करीत आहे तसेच वीजपुरवठा खंडित करीत आहे आणि दावा निकाली काढला. महाराष्ट्र राज्य आणि तहसीलदार यांनी नियमित दिवाणी अपील क्र.८९/२००१ दाखल केली. अपिलीय न्यायालयाने अपील मंजूर करून विद्यमान न्यायचौकशी न्यायालयाने दिनांक १५/०३/२००० रोजी नियमित दिवाणी दावा क्र. १४१/१९९७ नोंदविलेला न्यायनिर्णय आणि हुकूमनामा रद्द ठरवला. विद्यमान अपिलीय न्यायालयाने पारित केलेला न्यायनिर्णय आणि हुकूमनामा हा प्रस्तुत अपीलात आव्हान केलेला विषय आहे.

(३) अपीलकर्त्याच्या विद्वान वकीलानी ठोसपणे सांगितले की प्रतिवादींनी असा दावा केला होता की दाव्यातील मालमत्ता जी सरकारी जमीन होती तिचा लिलाव १९९७ मध्ये

एका प्रकाश काकडे या इसमास करण्यात आला होता आणि ते अतिक्रमण हटविण्यासाठी कारवाई करत होते. ही जमीन सरकारच्या मालकीची आहे हे सिद्ध करण्यासाठी प्रतिवादींनी एकही दस्तऐवज नोंदवलेले नाही, असाही युक्तिवाद करण्यात आला. बांधकाम ५० वर्षांहून अधिक जुने आहे आणि पीठ गिरणी सन १९८५ साली स्थापण्यात आली. सन १९८५ ते दिनांक १९/०३/१९९७ या काळात कोणतीही कारवाही करण्यात आली नसून कोणताही अतिक्रमणाचा प्रश्न उपस्थित करण्यात आला नाही. प्रकाश काकडे याने वादीच्या ताब्यात अडथळा आणणारे कोणतेही उघड कृत्य केल्याचा उल्लेख नाही.

(४) अपीलकर्त्याच्या विद्वान वकिलांनी त्यांच्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ, **<u>दिवाणी अपील क्र. ८७८/२००९ (स्मृती देबबर्मा (मृत) द्वारा कायदेशीर प्रतिनिधी -विरुद्ध- प्रभा रंजन देबबर्मा आणि इतर ) २०२२ लाईव्ह लॉ (एस सी) १९</u>** या न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे.

(५) या न्यायालयाने दिनांक २९/१०/२००७ रोजी च्या आदेशानुसार, कायद्याचा महत्त्वपूर्ण प्रश्न तयार केला आहे, तो खालीलप्रमाणे -

"संपूर्ण जगासमोर चांगल्या ताब्याची मालकी असताना एखाद्या व्यक्तीला खऱ्या मालकास वगळता बळजबरीने कसे काय बेदखल केले जाऊ शकते? आणि त्या तत्त्वावर विद्यमान कनिष्ठ न्यायालयांनी, जरी मालमत्ता वादीच्या ताब्यात आहे हे मान्य केले आहे तरी वादीवर चुकीचा भार टाकला आहे" .

(६) दोन्ही पक्षांचे विद्वान वकिलांचे म्हणणे ऐकले, दोन्ही विद्यमान कनिष्ठ न्यायालयांनी पारित केलेले न्यायनिर्णय आणि हुकूमनामे तपासले, प्रतिस्पर्धी पक्षांचा युक्तिवाद आणि आधार घेतलेले उद्धरण विचारात घेतले.

(७) विद्यमान अपिलीय न्यायालयाने विद्यमान न्यायचौकशी न्यायालयाचा निष्कर्ष उलटवला. असे दिसून येते कि वादीने स्वतःची आणि एक ज्ञानबा हजारेची पुराव्याकामी तपासणी केली. प्रतिवादी क्र.१ च्या वतीने, प्रल्हादराव लोखंडे या एका व्यक्तीची

पुराव्याकामी तपासणी करण्यात आली, तर प्रतिवादी क्र. २ तसेच प्रतिवादी क्र. ३ यांच्या तर्फे कोणताही तोंडी पुरावा सादर करण्यात आला नाही. वादीच्या म्हणण्या नुसार, त्याने बांधलेल्या खोलीत तो गेल्या १४ वर्षांपासून पीठ गिरणी चालवत आहे. त्याची पीठ गिरणी, राहते घर आणि कोठा एकमेकांना लागून आहेत आणि तीच त्याची वडिलोपार्जित मालमत्ता आहे. ग्राम पंचायत, आडगाव यांनी स्वतः दिनांक १२/१२/१९८३ रोजी ठराव मंजूर करून मंजुरी दिली असून सदर मंजुरी आदेश प्रदर्श क्र. ३५ वर आहे. ग्राम पंचायत येथे पीठ गिरणीचा कर भरणा केल्याची पावती (प्रदर्श क्र. ३६) हि त्याने अभिलेखावर दाखल केली आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने देखील या पीठ गिरणीला जोडणी दिलेली आहे. त्या संदर्भातील प्रमाणपत्र प्रदर्श क्र. ३४ वर आहे. त्याच्या साक्षपुराव्यास वादीतर्फे साक्षदार क्र. २ ज्ञानबा जे ग्राम पंचायत चे सरपंच आहेत यांनी समर्थन केले आहे. त्यांच्या साक्षपुराव्यानुसार, ही पीठ गिरणी गेल्या १५ वर्षांपासून तेथे अस्तित्वात आहे . त्यांच्या म्हणण्यानुसार वादीच्या गुरांचा गोठा, त्याचे राहते घर आणि वादीची पीठ गिरणी एकमेकांना लागून आहेत. ग्राम पंचायतीने परवानगी दिल्याच्या वस्तुस्थितीवर प्रतिवादींना आक्षेप नाही. सुमारे १२ ते १३ वर्षांपासून कोणत्याही अतिक्रमणाबाबत कोणतीही सूचना नाही. अतिक्रमणाच्या कोणत्याही निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी दाव्यातील मालमत्तेचे कोणतेही मोजमाप केले नाही असे दिसून येते. लिलावाचा आदेशाचे (हर्रास पट्टीचे) अवलोकन केले असता असे दिसून येते की भुखंड क्र. ३ प्रकाश काकडे या व्यक्तीला देण्यात आला होता, तथापि, या भूखंडात, वादी पीठ गिरणी चालवत आहे हे दर्शविणारी कोणतीही नोंद नाही. ग्रामपंचायतीचा ठराव प्रदर्श क्र.५१ वर आहे.

(८) विद्वान सहाय्यक सरकारी वकील यांनी प्रदर्श क्र. ५१ मधील उक्त ठरावाकडे माझे लक्ष वेधले. असा युक्तिवाद केला आहे की ग्रामपंचायतीने मंजूर केलेल्या ठरावानुसार, अतिक्रमणाची ही कारवाई करण्यात आलेली आहे. प्रतिवादींचा साक्षीदार प्रल्हादराव लोखंडे- प्रतिवादी क्र. १ ने कबूल केले आहे की वादीने भुखंड क्र. ३ वर अतिक्रमण केले नाही. प्रतिवादींनी अश्या प्रकारे प्रकरण मांडले की भुखंड क्र. ३ चा प्रकाश काकडे यांना लिलावा केल्यानंतर वादीने अतिक्रमण करून त्यावर पीठ गिरणी सुरू केली आहे जे अभिलेखावर नोंदवलेल्या कागदपत्रांच्या विरुद्ध आहे.

(९) ग्रामपंचायतीच्या दिनांक १२/१२/१९८३ रोजीच्या ठरावानुसार, वादीला पीठ

गिरणी सुरू करण्याची परवानगी देण्यात आली होती. वादीला कोणतीही नोटीस देण्यात आली नव्हती किंवा अतिक्रमण हटवण्यासाठी वादीविरुद्ध कोणतीही कार्यवाही सुरू करण्यात आली नव्हती. वादीने सरकारी जमिनीवर अतिक्रमण केले आहे असा वादी विरुद्ध पुरावा अभिलेखावर नसल्यामुळे, वादीला बेदखल करण्याची आणि वीजपुरवठा खंडित करण्याची प्रतिवादींची कृती म्हणजे सरकारी अधिकाऱ्यांकडून वादीचा होणारा छळ आहे. १९८३ साली पीठ गिरणी स्थापित करण्यात आली होती हे दर्शविण्यासाठी अभिलेखावर भरपूर पुरावे आहेत. ग्रामपंचायतीचे ठराव, वीजपुरवठा आणि कर पावतीची अभिलेखावर नोंद आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या वैध परवानगीने पीठ गिरणी सुरू करण्यात आली. त्यामुळे, आरोप केल्याप्रमाणे, वादीने भुखंड क्र. ३ वर अतिक्रमण केले आहे हे दाखवण्यासाठी अभिलेखावर पुरावे नाही. प्रतिवादींच्या साक्षीदारानेही या मुद्द्यावर मौन बाळगले आहे. वादीने त्याच्या मालकीची कोणतीही घोषणा करण्याची मागणी केलेली नाही ही वस्तुस्थिती ग्राह्य करण्यास विद्यमान अपिलीय न्यायालय अपयशी ठरले आहे. तो प्रतिबंधात्मक आदेशाचा दावा करत असल्याची त्याचा स्थायी ताबा असल्याबाबतची भीती लक्षात घेता, त्याने प्रतिबंधात्मक आदेशाचा दावा केला होता, विद्यमान अपीलीय न्यायालयाने असे मानले की, ग्रामपंचायतीच्या ठरावाने वादीला पिठाची गिरणी स्थापित करण्याची आणि चालवण्याची परवानगी दिली असली तरी, त्यामुळे भूखंड क्र. ३ वर वादीची मालकी सिद्ध होत नाही. प्रतिवादीचा साक्षदार क्र. १ प्रल्हादराव यांनी केलेल्या चुकीच्या कबुलीने हे मान्य केले आहे की पीठ गिरणीचे बांधकाम १० वर्षांहून अधिक काळापासून तेथे आहे. त्यांनी हे सुद्धा मान्य केले आहे की वादीने केलेल्या अतिक्रमणाचा उल्लेख हर्रास पट्टी, घोषणा आणि तहसीलदारांचा आदेश या दस्ताऐवजात नाही. त्याचप्रमाणे, या अर्जात भूखंडाच्या सीमांचाही उल्लेख केलेला नाही. वादीने केलेल्या अतिक्रमणाबाबत विभागाने वादी विरुद्ध कोणताही दावा दाखल केलेला नाही. त्याचप्रमाणे त्या संदर्भात त्यांना कोणतीही नोटीस पाठवण्यात आली नव्हती. त्याने हे मान्य केले आहे की वादीने भूखंड क्र. ३ वर अतिक्रमण केलेले नाही. सदर साक्षपुरावा लक्षात घेता, चुकीची कबुली म्हणून त्याचे वर्णन केले जाऊ शकत नाही.

(१०) हि वस्तुस्तिथी सुद्धा मान्य करण्यात आलेली आहे कि भूखंड क्र.३ ची मोजणी नझूल खात्याच्या मोजमाप करणाऱ्यांकडून झालेली नाही. उलट तपासणीमध्ये, सदर

साक्षदाराने त्याच्या साक्षीत वारंवार सांगितले आहे कि वादीने भूखंड क्र. ३ वर अतिक्रमण केलेले नाही आणि अगदी ग्राम ग्रामपंचायतीच्या ठरावातहि तसे नाही. अभिलेखावर असलेले पुरावे लक्षात घेता, विद्यमान अपिलीय न्यायालयाने अपील मंजूर करून पूर्णपणे चुक केली आहे. हे खरे आहे की, न्यायचौकशी न्यायालयाने मालकीबाबत मुद्दा तयार केला होता. तथापि, त्या संदर्भात कोणतीही घोषणा नाही आणि केवळ प्रतिवादींना वादीची पीठ गिरणी हलविण्यापासून तसेच प्रतिवादी क्र.२ ला वीजपुरवठा खंडित करण्यापासून प्रतिबंधित करण्यात आले होते .

(११) अपीलकर्त्याचे विद्वान वकील **<u>स्मृती देबबर्मा</u>** (उपरोल्लेखित) वर अवलंबून आहेत, ज्यामध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की, "मालक म्हणून गृहीत धरलेल्या स्वरूपातील आणि मालकीच्या सामान्य अधिकारांचा शांततेने वापर करणाऱ्या जमिनीच्या ताब्यात असलेल्या व्यक्तीला, योग्य मालक वगळता संपूर्ण जगाविरुद्ध कायदेशीर अधिकार आहे." अशा प्रकारे, वादीचा ताबा असल्याने, जोपर्यंत त्याला काढून टाकण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीला मालकी किंवा ताबा घेण्याचा हक्क या स्वरूपात अधिक चांगला कायदेशीर अधिकार नसेल तोपर्यंत त्याला (वादीला) त्याच्या ताबा संरक्षण आणि जतन करण्याचा अधिकार असेल. प्रतिवादींनी घेतलेले पुरावे पाहता, हे मान्य केल्याचे दिसून आले आहे की वादीला अतिक्रमणाची कोणतीही नोटीस देण्यात आलेली नाही, आणि फिर्यादीची पिठ गिरणी कायदेशीररीत्या आणि ग्रामपंचायतीच्या वैध परवानगीने १९८३ पासून चालू आहे. विद्यमान न्यायचौकशी न्यायालयाने दिलेल्या निकालात कोणतीही दुर्बलता नाही, आणि म्हणून विद्यमान अपिलीय न्यायालयाने पारित केलेला न्यायनिर्णय रद्द बातल करण्यास पात्र आहे. मी, त्यानुसार कायद्याच्या महत्त्वपूर्ण प्रश्नाचे होकारार्थी उत्तर देतो आणि असे ग्राह्य मानतो की अपिलीय न्यायालयाने जरी हे मान्य केले आहे कि मालमत्तेचा ताबा वादीकडे आहे तरी वादीवर भार टाकण्यात विद्यमान अपिलीय न्यायालयाने चुक केली आहे.

(१२) पक्षांच्या पुराव्यांचे अवलोकन केल्यावर असे दिसून येते की सरकारी अधिकाऱ्यांकडून कोणतीही प्रक्रियेचे अवलंबन केले गेले नाही आणि त्यादृष्टीने पाहता वादीला अनावश्यकपणे २५ वर्षांहून अधिक काळ त्रास सहन करावा लागला आहे. त्यामुळे

प्रतिवादींवर खर्च लादण्याचा माझा कल आहे.

(१३) म्हणून मी पुढील आदेश देतोः-

**आ दे श**

(अ) दुसरे अपील मान्य करण्यात आले आहे.

(ब) २ रे तदर्थ अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश, वाशीम यांनी नियमित दिवाणी अपील क्र. ८९/२००१ मधे दिनांक १३/१२/२००५ रोजी पारित केलेला न्यायनिर्णय आणि हुकूमनामा याद्वारे रद्द बातल करण्यात येत आहे.

(क) विद्यमान दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, वाशीम यांनी नियमित दिवाणी दावा क्रमांक १४१/१९९७ मधे दिनांक १५/०३/२००० रोजी पारित केलेला न्यायनिर्णय आणि हुकूमनामा याद्वारे कायम करण्यात येत आहे.

(ड) प्रतिवादींनी आजपासून एका महिन्याच्या कालावधीच्या आत अपीलकर्त्याला - वादीला दहा हजार रुपये नुकसान भरपाई म्हणून खर्च द्यावा.

(इ) त्यानुसार हुकूमनामा तयार केला जावा.

वरील अटींप्रमाणे अपील निकाली काढण्यात येते. प्रलंबित असलेले अर्ज (असल्यास) निकाली काढले .

(**न्यायमूर्ति**)

**अस्वीकरण**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरीता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल."